सहाय्यक वनसंरक्षक संवर्गातील एक पद, विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण नांदेड यांच्या कार्यालयाकडे वर्ग करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.एमएफएस-२०१९/प्र.क्र.५२/फ-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २९ मे, २०१९.

संदर्भ :- प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) म.रा.,नागपूर यांचे पत्र क्र.मवसे/मुले/पद वर्ग/प्र.क्र.१/१०१/१८-१९, दिनांक १०/०४/२०१९

प्रस्तावना :-

नांदेड सामाजिक वनीकरण विभागाचे कार्यक्षेत्र संपूर्ण नांदेड जिल्हा असून त्याअंतर्गत १६ तालुके आहेत. नांदेड जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र १०३३२ चौरस किलो मीटर आहे. नांदेड सामाजिक वनीकरण विभागातंर्गत सद्यस्थितीत सहायक वनसंरक्षक संवर्गातील फक्त एक पद कार्यरत आहे.

सामाजिक वनीकरण विभाग नांदेड मध्ये मग्रारोहयो, प्रचार व प्रसिध्दी, जिल्हा नियोजन समितीचे अनुदान, जलयुक्त शिवार, जैवविविधता, रस्त्याच्या दुतर्फा लागवड, आधुनिक रोपवाटीका, मध्यवर्ती रोपवाटीका व शासनाच्या महत्वाकांशी ३३ कोटी वृक्ष लागवड इत्यादी महत्वपूर्ण कामाचा समावेश आहे. ही बाब विचारात घेता, व्यवस्थापनाच्या दृष्टीकोणातून वनसंरक्षक सामाजिक वनीकरण औरंगाबाद येथे कार्यरत असलेले सहाय्यक वनसंरक्षक संवर्गातील एक पद, विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण नांदेड यांच्या कार्यालयाकडे वर्ग करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रस्तावित केल्यानुसार, वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, औरंगाबाद येथे कार्यरत असलेले सहाय्यक वनसंरक्षक संवर्गातील एक पद, विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, नांदेड यांच्या कार्यालयाकडे वर्ग करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	वर्ग करावयाचे पद	ज्या कार्यालयाकडून पद वर्ग करावयाचे आहे त्या कार्यालयाचे नाव	ज्या कार्यालयात पद वर्ग करावयाचे आहे त्या कार्यालयाचे नाव मुख्यालय
१	सहायक वनसंरक्षक	वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, औरंगाबाद.	विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, नांदेड.

सदरहू पद वर्ग केल्यानंतर या पदाचे पदनाम, सहायक वनसंरक्षक-२, सामाजिक वनीकरण नांदेड असे राहील. तसेच सदरहू पदाचे मुख्यालय नांदेड येथे ठेवण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०५२९१७१२२८२७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Niwrutti Dhas

Digitally signed by Anil Niwrutti Dhas
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=699d21cc89897191099434d443603426329c81b1b292ed2d168c892811118cc7, serialNumber=f85f1c64c05886c8d514e40d54d27ff3a80ffd907a05433b1c412b7f7ffa0afd, cn=Anil Niwrutti Dhas
Date: 2019.05.29 17:15:21 +05'30'

(अनिल धस)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद.
६. वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, औरंगाबाद.
७. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, नांदेड
८. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), म.रा. नागपूर.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद /नांदेड.
१०. मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
११. मा.राज्य मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
१२. प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक.
१३. वन विभागातील सर्व कार्यासने.
१४. निवड नस्ती (फ-८ कार्यासन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.३२.